पुण्य नगरी
मंगळवार, १० ऑक्टोबर २०२३ । नाशिक
३

सामाजिक कार्यकर्ते हेरंब कुलकर्णी यांच्यावर हल्ला

अहमदनगर - ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते हेरंब कुलकर्णी यांच्यावर तीन अज्ञात हल्लेखोरांनी लाकडी रॉड व लोखंडी रॉडने हल्ला केला. त्यांच्या दोन्ही हातांना व डोक्याला गंभीर दुखापत झाली आहे. त्यांच्यावर नगरमधील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ही घटना आज सकाळी ७.३० वाजण्याच्या सुमारास घडली. हेरंब कुलकर्णी हे नेहमीप्रमाणे सकाळी फिरायला गेले होते. त्यावेळी ही घटना घडली. हल्लेखोरांनी त्यांच्या डोक्यात व हातावर लोखंडी रॉडने वार केले. त्यामुळे ते रक्तबंबाळ होऊन रस्त्यावर कोसळले. त्यानंतर हल्लेखोरांनी तेथून पलायन केले. कुलकर्णी हे नेवासे खुर्द येथील रहिवासी आहेत. ते सध्या नगरमध्ये वास्तव्यास आहेत. ते या त्यांचे सामाजिक सुरेश कुलकर्णी हे नगरमधील प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ भाऊसाहेब फाटक हायस्कूलमध्ये शिक्षक होते. त्यांनी शिक्षण क्षेत्रात मोठे काम केले आहे. त्यांनी शिक्षक भारती या संघटनेची स्थापना केली. ते या संघटनेचे राज्याध्यक्ष होते. त्यांनी शिक्षण हक्क कायदा, शालेय पोषण आहार योजना, शिक्षक पात्रता परीक्षा, संच मान्यता, शिक्षकांचे प्रश्न, शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार, शिक्षण क्षेत्रातील खासगीकरण